# प्रकरण पहिले

# काव्य संकल्पना आणि स्वरुप व विचार

**काव्यसंकल्पना आणि स्वरुप विचार :**

काव्य म्हणजे काय ? व काव्याचे स्वरुप व विचारांचा थोडक्यात आढावा.

मराठीतील प्रारंभीची कविता मौखिक रुपात होती. सुमारे ११-१२ व्या शतकात ग्रांथिक वाङ्:मय निर्माण झाले. मराठी ग्रंथ निर्मितीचा प्रारंभच काव्यरुपाने झाला असल्याने मराठी कविता ही गद्यापेक्षा निश्चितच अधिक सन्माननीय ठरते. शके १११० मध्ये आद्यकवी मुकुंदराजांनी 'विवेकसिंधु' हा आद्यग्रंथ लिहिला. त्यानंतर सुमारे १०० वर्षांनी यादव काळात मराठी भाषेचा 'सुवर्ण काळ' निर्माण झाला. यादव काळात महानुभव पंथाच्या कवी व कवयित्रींनी मराठी वाङ्:मय समृद्ध केले. मराठी भाषेतील आद्य कवयित्री महदंबेने भावपूर्ण धवळे' गाऊन शीघ्र कवित्वाचे आणि अल्पाक्षर बव्हर्थकत्वाचे वैशिष्ट्ये दाखविले. भास्करभट्ट बोरीकर, दामोदर पंडित, नरेंद्र पंडित, विश्वनाथा, खळोव्यास अशा अनेक महानुभवीय कवींनी काव्यनिर्मिती केली. त्यांची प्रेरणा व हेतू हा ईश्वर भक्ती, कृष्ण स्तूती आणि पंथीय प्रसार हाच होता.

पूर्वीच्या काळातील सर्वच वाङ्:मय पद्यमयच होते. वेद, उपनिषदे, पूराणे इ. काव्यरुपात आहेत. श्रूती, स्मृती महाकाव्यापासून ते मराठी आद्य ग्रंथ विवेक सिंधू, ज्ञानेश्वरी पर्यंतचे सर्वच वाङ्:मय पद्य रुपातच आहे. आदिकाळापासून काव्याने मानवी संस्कृती, धर्म, कला, तत्वज्ञान शास्त्र अध्यात्म इ. सर्वच क्षेत्रे व्यापली आहेत. जोपर्यंत गद्य वाङ्:मय स्वतंत्रपणे आकारास आले नव्हते. तोपर्यंत कविता म्हणजे साहित्य हा विचार सर्वमान्य होता. संस्कृत साहित्यशास्त्रातही साहित्य म्हणजे काव्य या संकल्पनेला केंद्रस्थानी मानूनच साहित्यमीमांसा झाली आहे.

'काव्य' म्हणजे साहित्य ही संकल्पना इतकी व्यमिश्र आहे की, तिची सर्वसमंत अशी व्याख्या करणे, अशक्य आहे. अनेक साहित्यिकांनी काव्याची व्याख्या

करण्याचा प्रयत्न केला आहे. साहजिकच या व्याख्येतून व्यक्तिसापेक्षता येणे अपरिहार्य आहे.

काव्य म्हणजे 'शब्द' आणि 'अर्थ' याचे साहचर्य होय, असे भामह व रुद्रढ यांनी सांगितले. तर 'रसपूर्ण वाक्य म्हणजे काव्य' असे विश्वनाथ म्हणतो. 'रमणीय अर्थ प्रतिपादन करणारे शब्द म्हणजे काव्य' असे जगन्नाथ पंडित म्हणतो.

'A Poem is a spontaneous overflow of
powerful emotions' असे वर्डसवर्थ कवितेचे वर्णन करतो.

या व्याख्या विचारात घेताना आपणास असे जाणवते की, प्राचीन काळी सर्वच जनजीवन, जीवन व्यवहार धर्म, श्रध्दा, नितीमूल्ये ही तत्त्वाने भारलेलीच होती. आणि काव्य हेच त्या काळातील आत्माविष्काराचे एक सहज माध्यम होते. जेंव्हा गद्य अस्तित्त्वात आले तेंव्हा मानवी जीवन व्यवहार गद्याने व्यापले गेलेत. 'लीळा चरित्र' या आद्य गद्य ग्रंथापासून मराठी गद्य वाड्:मय सुरु झाले. आणि साहित्यात 'गद्य आणि पद्य' प्रकार हे दोन प्रकार निर्माण झाले, असे असले तर कविता हा एक मुलभूत वाड्:मय प्रकार म्हणून मान्यता पावला आहे.

ज्याप्रमाणे संगीताचे माध्यम स्वर, चित्राचे माध्यम रंग त्याप्रमाणे कवितेचे माध्यम शब्द आहेत. अर्थात गद्य वाड्:मयाचे माध्यम ही शब्दच आहेत, तरीही कविता हा एक मुलभूत आणि स्वतंत्र वाड्:मय प्रकार आहे. कवितेतील नाट्यात्मकता, भावव्यक्ती या गोष्टी आढळतातच. त्या आपल्याला ज्ञान व आनंद ही देतात. शिवाय या वाड्:मय प्रकारांनाही ज्ञान व आनंद ही देतात शिवाय या वाड्:मय प्रकारांनाही कवितेची आवश्यकता असते, असे असूनही इतर वाड्:मय प्रकार कविता आणि कविता यांच्यातील फरक आस्वादाच्या पातळीवर जाणवतो. याचे कारण शब्द हे माध्यम समान असले तरीही, कथात्मकता व नाट्यात्मकता या घटकावर कविता निर्मितीच्यावेळी काही संस्कार होतात. त्यामुळे या घटकांची प्रवृत्ती गद्यात्मक न राहता पद्यात्मक ही होते. कवीची स्वानुभूती व्यक्त करणारी कविता आणि त्या कवितेचा

आस्वाद घेताना होणारी वाचकाची मनोवस्था या गोष्टी कवितेच्याबाबतीत विचारात घ्याव्या लागतात.

'कविता' या संकल्पेनेचे आणि सुंदरतेचे अतूट नाते आहे. एखादी सर्वांग सुंदर गद्य कलाकृती जर एखाद्या रसिक वाचकाला खूप आवडली तर तो, मी एक सुंदर काव्यच अनुभवत होतो, अशी प्रतिक्रिया नोंदविण्याची शक्यता आहे. अशावेळी गद्य वाड्:मय कृतीला 'काव्या' ची उपमा देऊन तो काव्य आणि सुंदरता याचेच नाते केवळ आधोरेखित करीत नाही तर गद्यापेक्षा पद्य हे मनोरम, तरल हद्‌यस्पर्शी आणि विशिष्ट जाणीव जागृत करणारे असते असेच आपले मत आपण व्यक्त करतो.

**१) संत पंत तंत :**

मराठी काव्याला अनेक शतकांची परंपरा आहे. मराठी साहित्याचे स्थूलमानाने तीन प्रमूख प्रवाह मानले जातात. त्यामध्ये संत, पंत, तंत काव्य प्रकार आहेत.
तेराव्या शतकापासून मराठीत वाड्:मयनिर्मिती होऊ लागली याच काळात वारकरी पंथ व महानुभव पंथ यांच्या पुरस्कर्त्यांनी मराठीत विपूल अशी ग्रंथ निर्मिती केली. मराठी भाषा व वाड्:मय निर्मितीस त्यांचा मोठाच हातभार लागला. या काळातील वाड्:मय हे मुख्यत्वे भक्ती प्रेरणेने प्रकट झालेले आहे. वारकरी संप्रदायाने वाड्:मय निर्मितीची सलग आणि प्रभावशाली परंपरा निर्माण केली.

**२) पंडिती काव्य :**

मध्ययुगीन कालखंडातील पंडित कवींनीदेखील आपली कविता अध्यात्म व धर्मप्रेरणेने प्रेरित होऊनच लिहिली आहे. त्यांनी काव्य अधिक सजविले म्हणूनच त्यांना 'कला कवी' असे संबोधले जाऊ लागले. महादाईपासून मोरोपंत यांच्या पर्यंतची परंपरा संस्कृत काव्याचा आदर्श जपणारी आहे. पंडित कवितेची निर्मिती कारगिरीसाठीच झालेली आहे. त्यांनी अतिशय रसाळपणे पुराणातील कथानके सजवून सांगितली. मुक्तेश्वर, वामन, मोरोपंत हे पंडित कवी होत. संस्कृत, महाकाव्ये, पुराण

यांचा व्यासंग असणारे, कलादृष्टी असणारे हे कवी होत. या कवींनी समाजातील अभिजन वर्गाच्या अभिरुचीचे पोषण केले.

आकर्षक कथानक, रेखीव व्यक्तीचित्रण भावपूर्णनिवेदन, चित्रमय वर्णने, नाट्य, ओघवती भाषा व अनुरुप छंदाची योजना हे पंडिती कवितेचे विशेष होत. या परंपरेतील कवींनी भक्ती हे तत्त्व प्रमाणभूत मानून कला विकासाला अग्रक्रम दिला. या संदर्भात र. बा. मंचरकर लिहितात, आख्यात कविता ही संताची कविता आणि पंडितांची कविता यांना जोडणारा दुवा आहे. 'आख्यान कवितेच्या भक्तीप्रेरणा होऊन अधिक जाणीवपूर्वक काव्यात्म होण्याच्या दिशेने पंडिती कविता विकसित झाली असे मंचरकर म्हणतात''.[१]

### ३) शाहिरी काव्य :

मराठी कवितेच्या परंपरेत शाहिरी कवितेचे एक विशेष असे स्थान आहे. शिवकाळात उदयास आलेली ही कविता उत्तर पेशवाईत बहरास आली. ती मराठी समाज जीवनात लोकप्रिय ठरली. शाहिरी काव्यात लावणी व पोवाडा या रचना प्रकारांचा अंतर्भाव होतो.

आपल्या मालकांचे गुणवर्णन करणे व मनोरंजन करणे ही शाहिराची भूमिका होती. हीच शाहिरी कवितेची प्रेरणा होय. लोकांचे रंजन करणे वा मालकाचे गुणवर्णन अंतस्फूर्तीने अथवा आपल्या मनातील भाव-भावनाचा अविष्कार करावा या हेतूने ही कविता निर्माण झाली नाही. लोकांच्या आग्रहास्तव कुणाच्या तरी सांगण्यावरुन, त्या-त्या व्यक्तीच्या कौतुकांचा विषय झालेल्या व्यक्तीमत्त्वाचा गौरव व व्यावहारिक फायदा करुन घ्यावा, अशी शाहिरी वाङ्‌मय निर्मिती मागील प्रेरणा आहे. अनंत फंदी, राम जोशी होनाजी बाळा यासारख्या शाहिरांनी पेशवे दरबारात आपली हजेरी लावली. शाहिरांनी आपल्या राजाचे, त्याच्या पराक्रमाचे व विलासी जीवनाचे चित्र आपल्या काव्यातून रेखाटले.

म. वा. धोंड व म. ना. अदवंत या अभ्यासकांनी शाहिरी वाङ्:मयाचा उगम व अनुबंध मौखिक परंपरेतील लोक वाङ्:मयात शोधला आहे. त्यांच्या मते, लोकगीताची रचना व बांधणी स्वीकारुन हा काव्यप्रकार उदयास आला आहे.[२] मात्र शाहिरी काव्य लोक साहित्य नाही. संबंध शाहिरी काव्यातून संरजामशाहीचे व मोगली विलासाचे चित्र आपल्याला पाहायला मिळते. वास्तविक शाहिर हे समाजातल्या सर्व स्तरातून आलेले होते. ब्राम्हण, तांबोळी, शिंपी, सोनार, कासार, न्हावी, कोष्टी, साळी, माळी, तेली, मुसलमान, महार, मांग, ढोर अशा जाती धर्मातून हे शाहीर आले होते. परंतु त्यांच्या काव्यातून जनसामान्यांच्या भावभावना, सुख, दु:खे, इच्छा, आकांक्षा हे ऐष आरामी राज्यकर्त्यांचे होते. बहुजन समाजातील माणसांना हे आवाहन नव्हते. राजे-राजवाडे, सरदार व त्याच्या मनातील इष्कबाजी शृगार विलासिते यांची चित्रणे, त्यांनी आपल्या काव्यातून रेखाटली. त्यामुळे त्याच्या कवितेचा श्रोतावर्ग हा समाजातील उच्चस्तरातील राज्यकर्त्यांशी हितसंबंध असणारा सरदार, ग्रामातील अधिकारी प्रमुख असाच होता.

शाहिरांनी शृगारपर लावण्याच अधिक लिहिल्या, विवाह, पतीची आतुरतेने वाट पाहणारी स्त्री, मिलनाचा विरह युद्धास जाणाऱ्या पतीस निरोप, मुलुखगिरीवर गेलेल्या पतीविषयी काळजी असे काही विषय या शृगारिक लावणीतून प्रकट झाले आहेत. शाहिरांनी पोवाड्यातून वीर पराक्रमाची शैर्याची चित्रे रेखाटली. राजकीय, व्यक्ती, राजकारण युद्ध प्रसंग आदींशी असलेले नाते पोवाड्यातून व्यक्त होते. शाहिरी कवितेला नृत्य, नाट्य व संगीताची जोड मिळाली ती जास्तीत जास्त सादरीकरणासाठी लिहू जाऊ लागली. त्यामुळे शाहिरी काव्याचे मूल्य वाढले. शाहिरांनी आपल्या कवितेत भाषा सफाईदारपणे मांडली. छंद, रचना, शब्द योजना नाद, त्रास, थमक, खटका यांना शाहिरांनी विशेष महत्त्व दिले. राज जोशीसारख्या शाहिरावर संस्कृत वाङ्:मयाचा प्रभाव आहे. एकूणच शाहिरी काव्य हे रंजनासाठी व त्यांच्या गुण वर्णनासाठी अवतरले.

आधुनिक मराठी कवितेचा प्रारंभ कवी केशवसूतांच्या कवितेपासून मानला जातो. तत्पूर्वी १८१८ साली मराठेशाहीचा अस्त झाला. संबंध हिंदूस्थानवर ब्रिटीशांनी आपला एक छत्री अंमल प्रस्थापित केला. १८५७ ला नवीन विद्यापीठाची निर्मिती झाली. यामधून नवे ज्ञान लोकांना मिळू लागले. याच कालखंडात इंग्रजी शिक्षणाला मान्यता मिळाली. गद्यलेखनास सुरुवात झाली. याच काळात कवितेकडे पद्यकड दुर्लक्ष झाले. सामाजिक उपयुक्तेसाठी लेखन लिहिले जाते. असा दंडक निर्माण झाला व त्यामुळे ललित वाङ्:मयात गौण स्थान मिळाले. त्याचाच परिणाम म्हणून कविता हा वाङ्:मयप्रकार कवी व वाचक यांच्याकडून दुर्लक्षित झाला. मात्र या नव शिक्षणामुळेच कविता ही शिक्षित अल्पसंख्यांक लोकांची मक्तेदारी बनली. मौखिक परंपरेतील कविता ही मागे पडू लागली. कविता लिहिणे वा वाचणे हे लिहिता-वाचता येणाऱ्याचे क्षेत्र बनले. कविता ही नव सुशिक्षित माणसापुरती मर्यादित बनली.

**४) केशवसुतांची कविता :**

१८८६ ते १९२० हा मराठी कवितेचा क्रांती काळ समजला जातो. याच काळात केशवसूतांची कविता अवतरली माणसाला केंद्रबिंदू मानून नव्या विचारांची पहिली तुतारी केशवसूतांनी फुंकली. सुधारणावादाचा पुरस्कार करुन, जुन्या परंपरा टाकून नव्या युगाची हाक ऐकवायला लावणाऱ्या केशवसूतांनी नवीन मूल्य स्वीकारली आहेत. या काळात देखील जुन्या पंडिती वळणाचे काही कवी आढळतात. परंतु केशवसुतांच्या कवितेतून आत्मविष्कार प्रकटू लागला. काव्य लेखनाचे विषय प्रथमच बदलले. 'अंत्यजाच्या मुलाचा पहिला प्रश्न' 'मजुरावर उपासमारीची पाळी', 'गावी गेलेल्या मित्राची खोली लागलेली पाहून' असे जीवन व्यवहारातील परिचित विषय त्याच्या काव्याचे झाले. 'कविता आणि कवी' 'आम्ही कोण' या कवितांमधून काव्यविषयक नवी जाणीव त्यांनी निर्माण करुन दिली आहे. केशवसुतांच्या कवितेतून सामाजिक समतेचा, स्वातंत्र्याचा व बंधूतेचा विचार प्रकट झाला. मराठी समीक्षकांनी केशवसुतांच्या कवितेतील काव्यजाणिवेचे स्वरुप व तिचा अविष्कार यांचे नाते

युरोपीय रोमॅंटिसिझमशी जोडले मात्र केशवसूतांच्या कवितेतील आध्यात्मिकता, चिंतनशीलता ही भारतीय परंपरेतील आहे.

केशवसूतांच्या कवितेपासून मराठी कविता खऱ्या अर्थाने सभोवतालच्या जीवन व्यवहाराचे, वास्तवाचे चित्रण करु लागली. केशवसूतांच्या कवितेतील जाणिवांचे वेगळेपण विशेद करताना दि. के. बेडेकर म्हणतात, ''केशवसुतांच्या काव्य विश्वात मानवी मनाला केंद्रीय स्थान लाभले ही क्रांती फार मुलभूत आहे. त्यामुळे पूर्वी पारलौकिक अशा तत्त्वाभोवती गुंफले गेलेले श्रेय चिंतन कलात्मक सर्जन आता ऐहिकाशी, चिंतनाने व सर्जनाने आता घेतली.''[३] बेडेकरांनी केशवसुतांच्या कवितेतील जाणीव कलात्मकता व सर्जन व विशेषांचा उल्लेख केला आहे.

ऐहिक जीवनाचे चित्रण व आत्मविष्कार या प्रेरणा केशवसुतांच्या काव्यदृष्टीमागे होत्या. केशवसुतांच्या काव्यातून आवाहन क्षमतेचा, अलंकृततेचा प्रत्यय येतो. केशवसूतांनी अनेकविध मात्रावृत्तांचा अवलंब काव्य प्रकटीकरणासाठी केला. सुनीत रचनेसारखा नवा प्रयोग केला.

केशवसुतांच्या कवितेचे आवाहन, त्यांचा वाचक वर्ग हा त्या काळातील उच्चभ्रू सुशिक्षित वर्ग होता. परंतु केशवसूतांच्या काव्य जाणिवेचे वेगळेपण त्यांच्या समकालीन वाचकांच्या, कवी-लेखकांच्या फारसे लक्षात आलेले दिसत नाही. केशवसुतांनी मराठी कवितेला नवा विचार, नवा आचार व नवा उच्चार ही प्राप्त करुन दिला. म्हणूनच 'आधुनिक कवितेचे जनक' असे केशवसुतांना म्हणतात.

**५) रविकिरण मंडळ :**

१८८५ ते १९२० या कालखंडातील केशवसुत, रेव्हरंड टिळक, विनायक, बालकवी व गोविंदाग्रज या कवी पंचकांनी मराठी काव्याला प्रतिष्ठा मिळवून दिली. पण त्यानंतर कवितेचा प्रवाह खंडित होतो की काय ? अशी परिस्थिती निर्माण झाली. अशावेळी मंदवत जाणाऱ्या मराठी कवितेला रविकिरण मंडळानी आधार दिला. १९२३ मध्ये रविकिरण मंडळाची स्थापना झाली.

रविकिरण मंडळातील कवींनी कविता लोकांपर्यंत नेण्याचा प्रयत्न केला. त्यांनी काव्यवाचनाचे, काव्यमैफलीचे अनेक कार्यक्रम केले. ते कवितेच्या सादरीकरणावर लक्ष देऊ लागले. या मंडळातील कवींच्या कवितेने मराठी कवितेला साचेबंदपणा आणला. मंडळातील काही कवींनी दीर्घ काव्य व गझल लिहिल्या. या मंडळातील माधवज्युलियन यांची कविता काव्यदृष्ट्या सरस होती. माधव ज्युलियन यांची मध्यमवर्गीय भावजीवनाची, त्यांच्या प्रणयाची चित्रे कवितेतून रेखाटली. मध्यमवर्गीयांच्या सामाजिक संदर्भाचाही एक पैलू त्याच्या कवितेला आहे. त्यांनी नवे प्रयोग केले म्हणूनच माधव ज्युलियन यांच्या काव्याचे महत्व गो. वि. करंदीकरांनी 'केशवसूत व मर्ढेकर यामधील एकमेव दुवा.'[४] या शब्दात नेमकेपण सांगितले आहे.

**६) नव काव्य :**

नवकाव्याचे जनक बा. सी. मर्ढेकर यांनी आपल्या कवितेतून वास्तवतेचे चित्र उभे केले. दुसऱ्या महायुद्धानंतर सर्वसामान्य मानवाच्या मनात नैराश्य व वैफल्य निर्माण झाले. या वैफिल्याचे प्रतिबिंब साहित्यातून उमटू लागले. कवितेतील शब्दांचा गुळगुळीतपणा जाऊन त्या शब्दांना एक वेगळी धार आली. 'प्रेमाचे लव्हाळे' 'सौंदर्य नव्हाळे' शोधू जावे तर आसपास मुडद्यांची रास दिसते. आजचे वीर 'पोटाला भाकरी' हवी म्हणून लढतात येथे जगायची पण सक्ती आहे. मरायची पण सक्ती आहे. माणसाचे जीवन 'पिपात मेल्या ओल्या उंदरासारखे मरगळून पडले आहे. मर्ढेकरांचे सौंदर्य वेधी मन त्यांच्या अनेक कवितांतून दिसते. बुद्धीनिष्ठता, जाणीव नेणीव मिश्र प्रतिक्रियात्कम आशय, जुनी भाषा आणि संकेत यांचा परित्याग, त्याऐवजी अर्थवादी नवप्रतिमांचे संयोजन ही नवकाव्याची वैशिष्ट्ये सांगता येतात. नवकविता सगूण ऐंद्रिय प्रचिती घडवू लागली. नव कविनी शब्दाला नवे मूल्य चढविले. रुप-रस-स्पर्श, गंध इ. सर्व इंद्रियगोचर गुण शब्दात सामावून आहेत. याची प्रचिती नवकवींनी दिली. नवकवींची चार पिढ्या मानल्या आहेत. पहिली पिढी - मर्ढेकर, पु. शि. रेगे, य. द.

भावे, दुसरी पिढी करंदीकर पांडगावकर, बापट, तिसरी पिढी दिलीप चित्रे, आरती प्रभू' आणि चौथी त्यानंतरच्या कवींची.

मर्ढेकरी कवितेचे वारसदार य. द. भावे यांच्याकडे पाहिले जाते. 'आर्द्रा' आणि 'हळवे भिंग' हे त्यांचे कवितासंग्रह. कवीची वैयक्तीक प्रेरणा व सामाजिक परिस्थिती यांच्या संघर्षातून भाषेंची कविता जन्मली व्यापारी व गोरगरीब यांच्यातील आर्थिक दरी दाखवली आहे.

मराठीतील दुसरी एक काव्य प्रवृत्ती शरदचंद्र मुक्तीबोध यांच्या काव्यजाणिवेने प्रभावित झालेली दिसते. मार्क्सवाद, साम्यवादी जाणिवेची कविता मुक्तिबोधांनी लिहिली. ही मराठीतील महत्त्वाची कविता होय. गरीब आणि श्रीमंत, मजूर आणि मालक, शोषक आणि शोषित यांची चित्रे मुक्तिबोधांनी आपल्या कवितेतून रेखाटली. दु:खितांचे दरिद्र्य यांची चित्रे यांनी जाणीवपूर्वक रेखाटली. शरदचंद्र मुक्तिबोध यांचे 'यात्रिक' 'नवी मळवाट' हे महत्त्वपूर्ण काव्यसंग्रह आहेत. 'नवी मळवाट' या काव्यसंग्रहाला लिहिलेल्या दीर्घ अशा प्रस्तावनेमधून महत्त्वाचा असा काव्य विचार मांडला आहे. हे साम्यवादी विचार धारेतील कवी होत. स्वतंत्र वळणाने साम्यवादी जाणिवेने काव्य करणारे मुक्तिबोध हे स्वातंत्र्योत्तर काळातील महत्त्वाचे कवी होत. आशावाद, सामाजिक जाणीव प्रगतीशील विचार त्यांच्या कवितेत दिसतात. आजच्या विषम, अस्वस्थ, जीवनातून उत्पन्न झालेल्या प्रक्षोभाचे कढ आपल्या काव्यातून सजीव करणारा हा नवकवी आहे. वैफल्यातून आणि अंधारातून प्रकाशाची वाट चालू पाहणारा आक्रमक आशावाद त्यांच्या कवितेत आहे.

पु. शि. रेगे यांचे 'साधना', 'फुलोरा', 'दोला' व 'गंधरेखा', 'पुष्कळा', 'प्रियाळ', 'दुसरा पक्ष', 'सुहृदगाथा' हे कवितासंग्रह स्वातंत्र्योत्तर काळातील अल्पाक्षरी आत्ममग्न खानदारी वळणाची संस्कृतप्रचूर शब्दकलेची ही कविता स्वत्व संपन्न आहे. रेग्यांच्या प्रतिकेने स्त्रीच्या शरीर मनाचे नानाविध गुण वेचून एक कलापूर्ण स्त्री प्रतिमा म्हणजेच स्त्रींचे जणू एक नवे मिथ निर्माण केले आहे.

नव कवितेला सदानंद रेगे यांच्या कवितेच्या रुपाने एक वैशिष्टपूर्ण कवी लाभला. त्यांच्या 'अक्षरवेल', 'गंधर्व', 'देवा पुढचा दिवा', 'वेड्या कविता' या कविता संग्रहानी नव काव्याची सुक्ष्मता आणि अर्थ वैभव सूचकता आणि आशयातील नावीन्य यांची वाँढ केली. अभिव्यक्तीच्या विविध शक्यता, आशयाची समृद्धता, सूक्ष्मता या अंगाने मराठी कविता समृद्ध बनवली. वसंत हजरनीस, गं. बा. ग्रामोपाध्ये यांचा या कवींनी काव्यलेखन केले. वसंत हजरनीस यांचा 'वश्या म्हणे' हा सव्वीस कवितांचा संग्रह या कवितांवर मर्ढेकरांचा प्रभाव जाणवतो.

दिलीप चित्रे यांचे 'कविता' 'कवितेनंतरच्या एकूण कविता' इत्यादी कविता संग्रह प्रसिद्ध आहेत. त्यांनी गझल गीत, सुनित हे काव्य प्रकार हाताळले. चित्रे यांची 'शक्ती स्तोत्र' ही प्रदीर्घ चिंतनशील कविता आहे.

मंगेश पांडगांवकर यांनी 'धारानृत्य', 'जिप्सी', 'उत्सव', 'छोटी', 'वात्रटिका' हे कविता संग्रह लिहिले. 'धारानृत्य' मधील काही कवितात दीन-दलित -पीडिताविषयी जिव्हाळा जाणवतो. 'जिप्सी' कविता संग्रहात स्व:ताचे स्वतंत्र कल्पना विश्‍व गवसले आहे. हे कवी बा. भ. बोरकरांच्या निसर्ग संवेदनांशी समृद्ध झालेल्या कवितेचे संस्कार घेऊन आले. कोवळ्या नाजूक प्रेम भावनेच्या छटा यांचा गहिरा अविष्कार त्यांच्या कवितेतून दिसून येतो.

इंदिरा संत यांचे 'सहवास', 'शेला', 'मेंदी', 'मृगजळ', 'रंगबावरी', 'बाहुल्या' इ. कवितासंग्रह आहेत. मराठी स्त्रीगीतांच्या संस्कारातून त्यांनी शैली उंचावली व स्वत:च्या उत्कट भावनाविष्काराला प्राधान्य दिले. विशुद्ध भावकविता लिहिणाऱ्या कवयित्री म्हणून त्या ओळखल्या जातात. प्रियकराचे रुपदर्शन धडकविणारी चिरविरही प्रीती आणि निसर्ग हा त्यांच्या कवितेचा स्थायीभाव राहिला. आरतीप्रभू (चि. त्र्यं. खानोलकर) यांनी 'जोगवा', 'दिवेलागण', 'नक्षत्रांचे देणे' हे कविता संग्रह लिहिले. परिचित प्रतिमांना एक अनोखे चैतन्य देऊन त्यांची कविता जीवनाचा एक तरलपण प्रगल्भ प्रत्यय देत राहते.

### ७) १९६० नंतरची कविता :

साठोत्तरी मराठी कवितेत साठ पूर्वीच्या कवितेच्या तुलनेत बऱ्याच मोठ्या प्रमाणात निर्मिती झाल्याचे दिसून येते. या कवितेत प्रामुख्याने दोन नवीन प्रवाह आले. ग्रामीण साहित्य आणि दलित साहित्य. नवसंवेदना नव्या जाणीवा, जागृत होऊन कवितेची कक्षा वाढली. १९६० च्या सुमारास 'संतप्त तरुण पिढी ' आणि 'दलित साहित्य ' अशी दोन वाड्:मयीन बंडे झाली. आपल्या आर्थिक सामाजिक दु:ख आणि त्यातूनच दलित साहित्य जन्माला आले.

१९६० च्या सुमारास कांही खूपच छोटी नियतकालिके लिहिली गेली होती. 'शब्द ', 'दिशा ', 'रुपगंधा ', 'आता ', 'अक्षरे ', 'टिंबे ', 'वाचा ', 'चक्रवर्ती ', स. न. वि. वि. 'शून्य ', 'लहर ', 'विद्रोह ' अशा प्रकारची नियतकालिके लिहिली होती. वसंत गुर्जर, मनोहर ओक, चंद्रकांत खोत यासारखे कवी वृत्तीचे संपादक स्वत:च्या कविता यातून सादर करीत होते. तर नामदेव ढसाळ, राजा ढाले, अशोक बनसोडे इ. दलित कविता मासिकातून प्रसिद्ध झाल्या.

मर्ढेकरानंतर मराठी कवितेमध्ये महत्त्वाचे पर्व उलगडले ते नारायण सुर्वे यांच्या कवितेने त्यांचा पहिला काव्यसंग्रह १९६२ मध्ये 'ऐसा गामी ब्रहम्' या नावाने प्रसिध्द झाला 'माझे विद्यापीठ ', जाहिरनामा ' व 'सनद' हे त्यांचे महत्वाचे काव्यसंग्रह प्रसिध्द आहेत.

कवी ग्रेस यांच्या कवितेत लोक जीवनातून भारतीय संस्कृती संचिनातून साकार झालेली प्रतिमा सृष्टी येते. 'बगळयांचा झुलता माळ',मऊ सशाचा उखाणा', आणि 'राधेचे स्वप्न' कर्तिकातील धुके 'या कवितातून संदर्भ संपन्न प्रतिमासृष्टी आपले परंपरेत रुजलेले भाव विश्व अलगद जागे करते. गेस यांच्या 'संध्याकाळच्या कविता' मध्ये रोमॅंटिक भावविश्व अत्यंत धूसर तरलतेने प्रतिमांबित झाले आहे.

ना.धो. महानोर यांनी 'रानातल्या कविता' 'पावसाळी कविता', 'पानझड' हे कविता संग्रह लिहिले स्त्रीच्या शरीर मनाचे चित्रण महानोर निसर्ग प्रतिमांतून करताना

दिसतात ना.धो.महानोर यांनी अतिशय चांगल्या प्रकारे काव्यलेखन केलेले आपणाला दिसते. इंद्रजीत भालेराव यांनी ही ग्रामीण भागातील शेती, त्या रानातली काळीमाती यांचे वर्णन अतिशय चांगले केले आहे. 'पीक पाणी' या कवितेचा विषय काळी आई असा आहे. माती हा केंद्रबिंदू मानून ही कविता जीवनातल्या विविध स्तरांवर विस्तारली आहे.

१९८० नंतर जी मराठी कविता आली त्या काल खंडातील महत्त्वाच्या कवयित्री व त्याचे काव्यसंग्रह खालीलप्रमाणे आहेत. 'कवितेचे दिवस' कल्याणी इनामदार, सागर साद शरदिनी महाडेश्वर, फिर्याद -हिरा बनसोडे, 'आरंभ', अरुणा ढेरे, चकवा-माधवी देसाई , अंतरंग-हेमा लेले, 'आरसा'-आसावरी काकडे, चिमूटभर चांदणे, सुधा देठे, काच कमळे-सुमती लांडे इ.

रा. ग. जाधव यांच्या मते, या कालखंडातील कवयित्रींच्या कवितांची, स्त्री-मुक्तीची प्रचिती, उत्तम अभिव्यक्ती, सुखाच्या आनंदाच्या क्षणाचे चित्रण देशीयतेचे भान, संवेदनशीलतेचे लौकिककरण, शुष्क शब्द प्रतिमा व भाव प्रतिमा ही वैशिष्ट्ये जाणवतात. ते पुढे म्हणतात, 'बहुतेक कवयित्रींच्या काव्यविषयक भूमिकेत मित्रता, भाईपणे सहचर नाते यांचे विविध बंध व अनुबंध दिसून येतात.'[५]

१९६० नंतर दुसरा प्रवाह म्हणजे दलित साहित्य. दलित कवींनी काव्य लिहून त्यातून दलित जाणीव व्यक्त करणारी कविता रसिकांसमोर आली. या संदर्भात ललिता कुंभोजकर म्हणतात, '' ''दलित कवितेतील 'दलित' हा शब्द जातीवाचक नाही की तो मूल्यवाचक नाही अनेक शतकानंतर ज्यांना आपले स्वत्व गवसले, बाबासाहेबांच्या मानवमुक्तीच्या लढ्यातून ज्यांना अस्मिता लागल्या त्या स्वरातल्या जाणीवेचा वेगळेपणा 'दलित' या पदातून व्यक्त होतो. 'दलित तत्व' नाकारणे ही दलित कवितेची प्रतिज्ञा आहे. या 'नकारा' ला स्वीकाराचे अंग आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जे वैचारिक आंदोलन घडवून आणले. त्या आंदोलनाच्या जागृतीच्या पुरेपूर खुणा असलेले हे दलित साहित्य आहे.''[६]

१९६० नंतरच्या कालखंडात बाबासाहेबाच्या प्रगल्भ विचारांच्या बैठकीचे अधिष्ठान दलित कवितेला मिळाले. त्यामुळे ही कविता सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, शैक्षणिक इ. गोष्टींवर प्रखर हल्ला चढवू लागली. तशीच ही कविता कठोर आत्मपरिक्षणालाही सामोरे गेली. दलित कविता ही वेशी बाहेरुन थेट गावात आली. आणि हजारो वर्षे सडत कुजत माणसे कशी जगतात याचे वास्तव चित्रण केले. प्रस्थापित साहित्याने आजपर्यंत उपेक्षित ठेवलेल्या समाजाला डॉ. आंबेडकरांच्या क्रांतीगर्भ विचारांनी जसे 'स्व' गवसले तोच पाया घेऊन अनेक वर्षे भूक राहिलेल्या या 'मूकनायकाला' स्वत:ची भाषा दलित कवितेने दिली. सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, शैक्षणिक धार्मिक क्षेत्रात समानतेचे तत्त्व या कवितेने उचलून धरले. समाजाच्या निर्मितीसाठी वेदना, विद्रोह, नकार इत्यादीचे नवे भान घेऊन दुसऱ्या पिढीची कविता अवतरली. दुसऱ्या पिढीतील कवितेचे विशेष लक्षात घेत असताना या कालखंडातील काही महत्त्वाच्या कवींचा आढावा घेणे गरजेचे आहे.

**१) नारायण सुर्वे : (मार्क्सवादी कवी)**

दुसऱ्या टप्प्यावरील नवकाव्याचे प्रवर्तक मर्ढेकरांच्या नंतर १९६० नंतरच्या मराठी कवितेने दलित परंतु कष्टकरी श्रमकरीचे प्रश्न मांडले. काव्याच्या रुपाने तिसरे आणि नवे वळण घेतले ते कवी नारायण सुर्वे यांच्या काव्याने 'ऐसा गा मी ब्रम्ह' (१९६२) 'माझे विद्यापीठ' (१९६६) 'जाहिरनामा' (१९७५), 'नव्या माणसाचे आगमन' (१९९५) या चारही काव्य संग्रहातून श्री. सुर्वे यांनी कामगार जीवनातील उघडी नागडी उद्ध्वस्तता प्रभावीपणे मार्क्सवादी विचारातून मांडली. दु:ख, व्यथेच्या शब्दांत अंगार ओतणारा हा कवी 'अमुची दुनिया निराळी असल्याची जाणीव सतत ठेवतो. म्हणूनच इथल्या शोषित पिढीतांना अन्यायाच्या टाचेखाली तुडविले जाताना त्यांचा होणारा आक्रोश हा सुर्वेंच्या कवितेचा मध्यबिंदू आहे. कवी लिहितो,

''एकटाच आलो नाही युगाची ही साथ आहे,
सावध असा तुफानाची हीच सुरुवात आहे .''[७]

आजपर्यंत जी वेदना उरात जपून ठेवली ती या आशेवर की, कधीतरी त्याला दवा मिळेल पण ही वेदना अधिक असहाय्य करण्याचेच काम या परंपरेने केले. आम्ही आजपर्यंत काळोखात जगलो, मात्र आता तसे होणार नाही.

सूर्वेच्या काव्यनिष्ठा सामाजिक संदर्भात 'दलित जाणीवा' च्या अपेक्षेत काहीशा वेगळ्या मानल्या जातात. पण त्यांच्या कवितेचे केंद्र 'माणूस' हेच आहे. मर्ढेकर शरदच्चंद्र मुक्तीबोध, अमरशेख, नारायण सुर्वे इ. मार्क्सवादी विचारसरणीतून कविता लिहिल्या.

**२) नामदेव ढसाळ :**

एकूण मराठी काव्य जगतातच खळबळ माजवून देणारा अत्यंत सामर्थ्यवान विद्रोही व बंडखोर कवी म्हणून नामदेव, ढसाळांकडे पाहिले जाते. आंबेडकरी चळवळीची जाण असल्याने ढसाळांची कविता परिवर्तनाशी नाते सांगत अवतरली. 'गोलपिठा' (१९७२), 'मूर्ख म्हाताऱ्याने डोंगर हलविला' (१९७५), 'आमच्या इतिहासातील एक अपरिहार्य पात्र : प्रिय दर्शनी' (१९७६), तु ही इयत्ता कंची ? (१९८१), 'खेळ' (१९८३), 'गांडूबगीचा' (१९८६), या सत्तेत जीव रमत नाही' (१९९५) इ. काव्य संग्रहातून नामदेव ढसाळ यांनी आपले वेगळेपण सिद्ध केलेले आहे.

डॉ. बाबासाहेबाच्या विचारावर पोसलेली नामदेव ढसाळ यांची कविता आहे. नामदेव ढसाळ यांची कविताही विद्रोहाचे धगधगते रुप घेऊन अवतरली आहे. या कवितेसंबंधी भालचंद्र फडके म्हणतात, '' आजवर जे भोगले ते सांगता सांगता प्रस्थापित उलथून टाकण्याच्या पवित्र्यात ती उभी आहे. ''[८] ढसाळाची कविता हीच मुळात पांढरपेशा जगाच्या सीमा जेथे संपतात व जिथे निर्मनुष्य प्रदेश (नो-मॅन्स लॉन्ड) सुरु होतो. तिथून चालू होते. त्यांच्या गोलपिठा'च्या प्रस्तावनेत विजय तेंडूलकर म्हणतात, ''गोलपिठा नावाने ओळखले जाणारे हे जग रात्रीच्या दिवसाचे, रिकाम्या किंवा अर्ध भरल्या पोटांचे, मरणाच्या स्वरताचे, उद्याच्या चिंताचे शरम आणि संवेदना

जळून उरणाऱ्या मनुष्य देहाचे, असोशी वाहणाऱ्या गठरांचे, गटाराशेजारी मरणांची थंडी निवारीत पोटाशी पाय मुडपून झोपणाऱ्या तरुण रोगी देहांचे, बेकारांचे, भिकाऱ्यांचे खिसे कापूचे, बैराग्यांचे, दादांचे आणि भडव्यांचे''[९]

विजय तेंडूलकरांच्यावरील अभिप्रायावरुन नामदेव ढसाळाच्या कवितेची जातकुळी लक्षात येते. आशय अभिव्यक्तीबरोबरच या कवितेने प्रस्थापित कवितेच्या रुपबंधाला हादरा दिला. आपले असे अभिव्यक्तीचे एक नवे तंत्र निर्माण केले भाषा, धार यांची तोडफोड झाली. या मोड-तोडीबरोबरच विद्रोहाची प्रखर रुप या कवितेला आले म्हणूनच कवी त्वेषाने म्हणतो,

'' हे महाग्यानी लोक हिंडताहेत ... मशाली पेटवून
गल्लीबोळातून चाळीचाळीतून - जेथे उंदीर उपाशी मरतात
त्या आमच्या खोपटातील काळोख म्हणे यांना कळतो.
पाणचठ गवशीसारखे हे ही एक थोर !
ज्यांना मांडीखालचा अंधार कळत नाही ! त्यांनी पेटलेल्या
माणसांना छप्पन टिकली बहुचकपणा अजूनही दाखवावा ''[१०]

ही कविताच मुळात माणूस म्हणून जगणे नाकारणाऱ्या विद्रोहातून जन्म घेते. म्हणून कवी इथल्या महाग्यानी धर्म मार्तंडांचा उपहास करतो. विद्रोहाने पेटलेल्या या कवीची झेप झंजावतासारखी झटणारी आहे. मनातली सगळी रग-धग, जळजळ, दु:ख, द्वेष, क्रोध, चीड, सारी कवीने बेमुर्वतपणे अंगावर निखारे फेकावेत तशी फेकली आहे. या विद्रोहाच्याच पोटात नवमानवाची संकल्पना 'बाळसे' धरु लागली आहे. कवी म्हणतो,

''माणसाने पहिल्या प्रथम स्वत:ला
पूर्ण अंशाने उद्ध्वस्त करुन घ्यावे....
नंतर उरल्या सुरल्यांनी कुणालाही गुलाम करु नये, लुटू नये.
आभाळाला आजोबा आणि जमिनीला आजी मानू

त्याच्या कुशीत गुण्यागोविंदाने आनंदाने रहावे ....

एक तीळ सर्वांनी करंडून खावा ...

माणसावर सुक्त रचावे

माणसाचेच गाणे गावे माणसाने "[११]

विद्रोहा बरोबरच विश्वमानव्याची संकल्पना नामदेव ढसाळ यांची कविता व्यक्त करते. म्हणूनच योगेंद्र मेश्रामांनी त्यांना 'वर्तमान प्रवाहातील बंडखोर कवी' असे म्हटलेले आहे.

**३) केशव मेश्राम :**

केशव मेश्राम यांचे 'उत्खनन', 'जुगलबंदी' 'अकस्मात' असे प्रमुख तीन कवितासंग्रह प्रसिध्द आहेत. दलित काव्याला एक संवेदनशील कवितेची बैठक चांगली निर्माण केली. दलित समाजातील माणसाला जगण्यासाठी ज्याप्रकारे धडपडावे लागते, तो पिढ्यानपिढ्या प्रकार चालत आलेला पाहून कवी चिडतो,

" साल्या तुकडाभर भाकरीसाठी

गाडीभर लाकडे फोडशील काय ?

चिंचुक नेसल्या आईच्या पटकुराने

घामेजले हाडके शरीर पुसशील काय ?

...एक दिवस मी परमेश्वराला आईवरुन शिवी दिली [१२]"

मेश्राम यांच्या कविवेतून विद्रोहाबरोबरच, मानसिक प्रक्षोभ कारुण्य, उपरोध व वस्तुस्थिती भाव अशा संमिश्र विचार भावनांचा समुचित अविष्कार होतो. कवीची संवेदनशीलता व्यक्तीमत्वाकडून सामाजिकतेकडे झेपावताना दिसते.

**४) दया पवार :-**

दलित कवितेला एक नवे परिमाण, सामर्थ्य प्राप्त करुन देण्याचे कार्य दया पवार यांच्या कवितेने केलेले आहे. त्यांचा 'कोंडवाडा' हा संग्रह १९७४ साली प्रसिध्द झाला. दया पवार यांची कविता ही त्यांनी प्रत्यक्ष भोगलेल्या जीवनानुभूतीचे दर्शन

आहे. चातुर्वर्ण्य व्यवस्था, जातिभेद, शोषण, छळवणूक, आर्थिक, सामाजिक विषमता, दारिद्र्य व अस्पृशता यांनी कोंडी केलेल्या दलित माणसाच्या दुःखाचे वंचनेचे, उपेक्षा मानहानीचे प्रत्ययी दर्शन पवारांच्या कवितेत येते.

" देव धर्म आणि देश फडफडणारी ही तुमची बुजगावणी,

अक्कल हुशारीने रचलेत सापळे

बोला माणुस चिडला की नाही ?"[१३]

अस्पृश्यता व जातिभेदाने पोखरलेल्या आपल्या या भारत देशाच्या महान संस्कृतीवर, समाज व्यवस्थेवर कवी उपरोधिक प्रहार करतो. एकूण आयुष्यात भोगलेल्या दुःखातून आलेला निराशेचा, स्वर त्यांच्या कवितेतून दिसून येतो.

**५) यशवंत मनोहर :-**

यशवंत मनोहर यांनी 'उत्थानगुंफा' (१९७७), 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर एक चिंतन काव्य' (१९८२) आणि 'मूर्तीभंजन' (१९९५) हे तीन संग्रह प्रसिध्द केलेले आहेत. मनोहरांच्या कवितेने विद्रोहाची परिसीमा गाठलेली आहे. प्रस्थापित कवितेला नवे विद्रोहाचे हादरे देण्याचे काम या कवितेने केलेले आहे. मनोहरांची कविता ही मनात उकळणाऱ्या विद्रोहाचे रसायन आहे. इथल्या पक्षपाती संस्कृतीवर तिने जोराचे प्रहार केलेले आहेत. दलित जाणीव व अभिव्यक्तीचे अपूर्वरुप मनोहरांच्या कवितेने साकारले आहे.

" पाखंड्यानो आता । नका मारु थापा ।

आम्ही झालो गुंफा । उत्थानाच्या "।[१४]

मनोहरांची कविता व्यवस्थेविरोधी विद्रोही प्रकट करत समर्थपणे पुढे जाणारी आहे. त्याच्या कवितेतून सामाजिक जाणीव व्यक्त होते.

**६) वामन निंबाळकर :-**

वामन निंबाळकरांचा 'गाव कुसाबाहेरील कविता' (१९७३) हा संग्रह प्रसिध्द आहे. त्याच्या कवितेतून दलितांच्या दारुण जीवनावस्थेबद्दल चीड व्यक्त होते. बुध्दाचे

विचार हे खऱ्या अर्थाने समतेचा महान संदेश आहेत. समता, स्वातंत्र्य, बंधुता हा लोकशाही समाजवादाचा अर्थ निंबाळकरांची कविता सांगते. त्यांनी दलित जीवनालाच आपल्या कवितेचा विषय बनवलेले आहे. शब्दशक्ती असणाऱ्यांनी रचलीत महाकाव्ये सोन्याचा घास खाणारांची भरजरी वस्त्र नेसणाऱ्यांची आकाशात राहणाऱ्यांची, पण मातृभूमीवरील दलितांच्या व्यथांची आसवांचे गाणी त्यांनी कधीच गायिली नाहीत. म्हणूनच आता आम्हाला शब्द सापडलेले आहेत. आता आम्हीही पेटवत जाऊ शब्दानेच देश आणि माणसे असा आत्मविश्वास निंबाळकरांच्या कवितेत येतो.

'' शब्दांनीच पेटतात घरे, दारे देश
आणि माणसे सुध्दा
आणि विझवतात आगही
शब्दांनी पेटलेल्या माणसांची '' [१५]

उगवत्या सुर्याची स्वप्ने घेऊन येणारा क्रांतीचा आवाज आजच्या सर्वच विद्रोही कवींचा आवाज आहे. निंबाळकरांच्याही कवितेत तो विद्रोही आवाज पेलण्याचे सामर्थ्य आहे.

**७) ज. वि. पवार :-**

ज. वि. पवार यांचे 'नाकेबंदी' (१९७६) व 'उच्छावास युगंधराचे' हे दोन कवितासंग्रह आहेत. हाके-हाकेवर नाकेबंदी करणाऱ्या दलितांच्या अस्तित्वालाच नख लावणाऱ्या संस्कृती विरोधीच रुढ कढ नाकेबंदीतून बाहेर पडलेले आहेत. पवारांची कविता ही बाबासाहेबांचे विचार क्रांतीचे प्रेरणा घेऊन बोलते. ती चळवळीची भाषा बोलते. त्यामुळे ती वैयक्तिक न राहता सामाजिकता धारण करते. पिढ्यानपिढ्या ज्या संस्कृतीने दलितांची जी नाकेबंदी केली त्यांच्या विरोधात हे शब्द शस्त्र होऊन येतात.

'' हे ही मीच सांगावे का, की उभारलेले हात,
माझे आकाश छेदून जात आहेत.

ग्रंथाग्रंथातील रक्त उतरतच चाललय माझ्या डोळ्यात

पेटलाय वणवा झालाय भडका "[१६]

पवारांची निष्ठा वर्गीय असण्यापेक्षा सामाजिक आहे. ती शुध्द आंबेडकरी आहे. म्हणूनच सामुहिक वेदनेचा आवाज देणाऱ्या समाज संस्कृतीला जशी नाकारते तशी ती साहित्य संचितालाही नाकारते.

**८) अर्जुन डांगळे :-**

'छावणी हालत आहे' (१९७७) हा डांगळे यांचा कवितासंग्रह प्रकाशित आहे. त्यांच्या कवितेत समाज जीवनाच्या कुरुपतेचे चित्र जेवढ्या प्रभावीपणे येते तेवढ्यात प्रभावीपणे मानवी मनाच्या शोषिकतेचा व समंजसपणाचा उदगारही सापडतो. डांगळे यांची कविता नेहमी आव्हानाच्या भाषेत बोलते. प्रकाशमान भविष्यावर डोळे लागलेल्या या कविची समाजाशी बांधलेली नाळ कायम ठेवण्याची अनन्य निष्ठा आहे. समाजाच्या वेदनेशी अनुकंप आहे. म्हणूनच भुके कंगालांचा जुलुम होऊन कवी म्हणतो.

" तू गात रहा - भुके कंगालांचा जुलुस होऊन

तू गात रहा - मुक्तवाहिनी किंवा व्हिएतनामी होऊन

तू गात रहा - चवदार तळ्याचा सत्याग्रह होऊन "[१७]

मुक्त वाहिनी, व्हिएतनामी किंवा चवदार तळ्याचा सत्याग्रह या ऐतिहासिक घटितांची लढाऊ स्मृती घेऊन येणारी ही कविता परिकथेप्रमाणे केवळ काल्पनिक नसून इथल्या मातीच्या गंधाने माखलेली वास्तवाशी झुंजणारी आणि चळवळीच्या छावणीची अस्मिता जागी करणारी आहे.

**९) भुजंग मेश्राम :-**

भुजंग मेश्राम यांचा 'उलगुलान' हा १९९० साली प्रकाशित झालेला कविता संग्रह आहे. यातील कवितेने आदिवासी दुःख, दारिद्रय समोर मांडले. आदिवासींच्या क्रांतीकारी लढ्यातून, संघर्षातून ही कविता आकारला आलेली या क्रांतीकारी

विचारांचा प्रणेता हा महान क्रांतीकारक आहे. त्यांनी या व्यवस्थेविरोधी जो लढा दिला, याच भूमिकेतून इतिहासाचे विश्लेषण ही कविता करते. मेश्रामांची कविता अन्यायी व्यवस्था, रुढी, परंपरा यांना ठाम नकार देते. त्याच्या विरोधात विद्रोह पुकारते.

मराठी कवितेत न आलेले रानवली डोंगरदऱ्यात खितपत पडलेले समाजजीवन 'उलगुलान' मध्ये मेश्राम यांनी चित्रीत केलेले आहे. या कवितासंग्रहाबद्दल महेंद्र भवरे लिहितात, आदिवासी समूह मनाचा अविष्कार म्हणजे उलगुलान आणि आदिवासी भारताची शोधयात्रा म्हणजे उलगुलान "[१८] हा इतिहास आमचा आहे तो आम्ही घडविला मात्र त्यांचे हक्कदार दुसरेच झाले. या विषयी ही कविता चीड व्यक्त करते.

" ते आले तेव्हा, त्यांचेकडे भटकंती होती आणि,
आमच्याकडे इतिहास ते म्हणाले, 'आपण सर्व करु अदलाबदल
अन बदलू जग' केला विश्वास आता त्याचेकडे आहे इतिहास
अन आमचेकडे विमुक्ती."[१९]

एकूणच आदिवासींच्या दुःख यातनांचा पट ही कविता सांगते. मेश्राम यांची कविता भूतकाळ आणि वर्तमान काळ अशा काळात फिरत राहते. इतिहासाच्या आकलनातून प्राप्त झालेल्या आत्मभावनातून आपल्या समुहाला कराव्या लागणाऱ्या संघर्षाच्या वाटा ही कविता दाखविते.

**१०) लहु कानडे :-**

लहु कानडे यांचे 'टायटिभा' (१९९६), क्रांतीपर्व (१९९२) हे दोन कविता संग्रह प्रकाशित आहेत. कवी ज्या समाज जीवनातून आला तो समाज जीवन त्याच्या कवितेतून अधोरेखित होते. अस्पृश्यतेचा दाहक अनुभव हा या कवितेचा केंद्रस्थानी आहे. जाती व्यवस्थेच्या समाजात सापडलेल्या समुह जीवनाची, जाती व्यवस्थेने दिलेल्या अटळ दुःखाची कहाणी या कवितेने मांडलेली आहे.

" आठवून हाल

रडायचा वाव

चावायचे साप

जातीचेच ''[२०]

कानडे यांची कविता मानवाच्या जीवनाच्या अदिम इतिहासाचा शोध घेते. नव्या शतकाची चाहूल आणि हाताशी लागणाऱ्या काही शक्यता यातून अस्वस्थ मनाची स्पंदने कानडेंच्या कवितेतून अविष्कृत होतात. थोडक्यात या कवितेत दलित कवितेचे विकसित रुप दिसून येते.

**११) भीमसेन देठे :-**

'होरपळ' या कविता संग्रह डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महानिर्वाणदिनी म्हणजे ६ डिसेंबर (१९७७) अत्यंत स्फोटकपण समृध्द भावजीवनाचे दर्शन त्यांच्या कवितेतून प्रभावी दिसून येते. आपण ज्या समाजात जगतो. त्या समाजाची स्थिती अतिशय बिकट आहे, त्यासाठी समाजाला वाचा फोडण्यासाठी कवी म्हणतो,

'' तुला सोनेरी किरणात भिजायचंय ना ?

मग आपले कफन आपणच बांधायला शिकायला हवं,

असलं हे किडा मुंगीसारखे अस्तित्व नाकारणांरं जिणं

मला नामंजूर आहे.''[२१]

कवि म्हणतो, तुला घुटमळायचं असेल तर चालतोही मला जगायचंय ! आहे त्या किडा मुंगीच्यासारखे जगण्याच्या स्थितीचा लाचारीत घुटमळण्याचा उद्रेक कवीला पेटवून सोडतो आहे. प्रत्यक्ष प्रेयरी-पत्नीही बंडखोरीला साथ देत नसेल तर तिलाही चालती हो असे सांगण्याची त्याच्या मनाची तयारी आहे. ह्या पेटत्या संगरात मृत्यू जरी आला तरी तेच जगणे ठरेल अशी श्रद्धा तो बोलून दाखवीत आहे.

या काळात स्त्रियांनीही काव्यलेखन मोठ्या प्रमाणावर केलेले आहे. दलित कवियित्रींची कविताही भावनोत्कटपेक्षा चिंतन शीलतेशी जवळचे नाते सांगते. स्वत:बरोबर वाचलाकाही अंतर्मुख करुन नव्या विचारांकडे झेपावयास लावणारी ही

कविता आहे. पुरुषी अहंकाराने आजपर्यंत जे शोषण केले त्या शोषण व्यवस्थेविरूध्द ही कविता बोलते, आक्रोशते मात्र हा आक्रोश उरबडवा नाही ती शोध घेत असते. स्वतःच्या अस्तित्वाचा म्हणूनच प्रखर आत्मशोधन हे दलित कवियित्रींच्या काव्यलेखनाचे वैशिष्ठ्ये आहे. या अनुषंगाने काही स्त्री कवियित्रींचा आढावा घेता येईल.

**१) हिरा बनसोडे :-**

हिरा बनसोडे यांचे 'पौर्णिमा' (१९७०) आणि 'फिर्याद' (१९८४) हे दोन काव्यसंग्रह प्रकाशित झाले आहेत त्या आपल्या काव्यसंग्रहाबद्दल लिहितात, ''पौर्णिमा' ही कोवळ्या कळ्यांची सुगंधी बरसात, उमलत्या किरणांची सोनेरी पहाट, मधुर प्रीतीची गोड नजाकत, पण या हळव्या स्वप्नाळू भावना म्हणजे मृगजळच'' या मृगजळातून 'फिर्याद' मध्ये बहुतांशी बाहेर पडलेल्या दिसतात.

बहिष्कृत म्हणून आणि स्त्री म्हणून कवयित्रीच्या वाट्याला आलेले अनुभव त्यांच्या काव्यातून बोलके होतात. या देशात स्त्री गुलाम आहे, तिच्या स्वप्नांची मुक्त पाखरे मारली जातात. इथली संस्कृती विषमतेचा अनुभव देते ही तक्रार करताना त्या म्हणतात,

'' ही माझी फिर्याद
आमच्या कर्मठ संस्कृतीवर आहे,
जिने आम्हांला बंद कोठडीत कैद केले आहे
जिथे आम्हाला बहिष्कृत आयुष्याचे दान आहे
जिथला वारा आम्हाला परक्यासारखा वागवतो.
.....जिथला पाऊस आम्हांला फक्त दुष्काळच देतो.
जिथले पाणी आमच्याशी मृगजळाची जीवघेणा खेळ खेळते'' [२२]

दलित जीवनासंबंधीची फिर्याद नोंदविणे हे कवितेचे केवळ कार्य नाही, तर व्यवस्थेच्या विरोधात ठामपणे उभे राहून सातत्याने संघर्ष करणाऱ्या प्रबळ शक्तीचे

रुपच त्यातून साकार होते. परंतू अशा शक्तीदायी रुपाचे विद्रुपीकरण करणे हे सनातन व्यवस्थेच्या सोयीचे असते. मग अशा प्रतिमा, प्रतिकांना देव त्याच्या चौकटीत बसविणे हा तर इथल्या सनातन व्यवस्थेचा स्थायीभाव आहे.

पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रीवर होणाऱ्या अन्यायाचे आणि अत्याचाराचे हिराबाईने विस्तृत चित्रण केले आहे. त्याचप्रमाणे जुन्या नव्या मराठी कवितेच्या अनेक विशेषांचे दर्शन फिर्यादमध्ये घडत जाते. त्यामुळेच हिराबाईंची कविता जुन्या नव्या मराठी कवितेच्या सीमा रेषेवरुन वाटचाल करणारी कविता आहे.

**२) ज्योती लांजेवार :-**

ज्योती लांजेवार यांचा 'दिशा' (१९८२) हा काव्यसंग्रह प्रकाशीत आहे. लांजेवार यांची कविता ही मानवतेच्या आणि समानतेच्या प्रतिष्ठापनेसाठी क्रांतीकारक नवविचारांची पेरणी करणारी आहे. समाजसेवेच्या गप्पा मारताना परिवर्तनवादी मंडळी बेगडी वागतात. अशा बेगडी परिवर्तनवाद्यांचा बुरखा फाडण्याचे काम या कवितेने केलेले आहे. आपल्या स्वार्थासाठी ज्यांनी दुकाने थाटली. या दुकानी व्यवस्थेविरूध्द ही कविता आवाज उठवते. स्त्रियांच्या दु:खाच्या विविध पदरांनाही ही कविता सक्षमपणे मांडते.

माझ्या डोळ्यापुढे सतत उभी असते
कौरवांच्या राज्यसभेत बेअब्रु होणारी पांचाली''[२३]

इतिहासाची वास्तवाशी सांगड घालून महाभारत कालीन स्त्रीची अशी अवस्था होती. तशी ती आजही आहे. त्यात कोणताही बदल झालेला नाही. एकूणच नवक्रांतीसाठी प्रवृत्त करत असताना या कवितेने विवेक जपला आहे. विवेकातून पेटणे हा या कवितेचे लक्षण आहे. नवक्रांतीचा ध्यास घेऊन नवसंस्कृती निर्माण करण्याचे या कवितेचे प्रयोजन हे माणुसकीवर आधारलेले आहे.

**३) सुरेखा भगत :-**

सुरेखा भगत यांचा 'साक्ष' हा कविता संग्रह प्रकाशित आहे. वास्तवता आणि जीवनातील भीषण नाट्य पकडण्याचा भगत यांच्या कवितेत प्रयत्न केला आहे. भगत यांची कविताही रुढी-परंपरेच्या विरोधी बोलते.

" दु:खितांचे आसून पुसण्याऐवजी

आसू येणेच थांबविले पाहिजे"

कवयित्रींच्या कवितेमधून अस्तित्ववाद डोकावतो. परंतू त्याला कार्यकारण भाव असल्याने तो संयमाने व्यक्त होतो. ही कविता आशावादाकडे झुकलेली दिसून येते.

**४) प्रज्ञा लोखंडे :-**

प्रज्ञा लोखंडे यांचा 'अंत:स्थ' हा दलित कवितेतील एक महत्वाचा काव्यसंग्रह आहे. 'अंत:स्थ' मधील कविता परंपरेच्या चिरवंदाना हादरे देतच आलेली आहे. डॉ. बाबासाहेबांच्या विचारांचे वादळ या कवितेतून घोंघावताना दिसते. लोखंडे यांच्या कवितेविषयी ज्योति लांजेवर म्हणतात, "शोषित स्त्री जेव्हा मनातला व डोक्यातला काळोख होऊन उजेडाच्या मार्गावर चालू लागते आणि आत्मभान निर्माण करण्यासाठी शब्दाचे रान तुडवू लागते तेव्हां तिला अनुभवांची आरास नको असते. वेदनेची सजावट नको असते."[२५] स्त्री मनाची घालमेल यी कविवेतून व्यक्त झालेली आहे.

"स्त्रीत्वाचा मूक आक्रोश सजवण्यात

धन्य असलेली आपली महान संस्कृती

.......जोहरापासून सतीपर्यंतचा प्रवास

इक्कीसवी सदीत तसूभरही बदलला नाही

रुपकुंवर.........![२६]

अशाप्रकारे समाजातील स्त्रीत्वाची वेदना कवयित्रीने व्यक्त केलेली आहे .

**५) मीना गजभिये :-**

या कवयित्रीच्या सामर्थ्याचा अनुभव 'येरे येरे पावसा' आणि 'प्रकाश विरघळला अंधारात' या कवितांतून येतो. गजभिये यांची कविता दलित स्त्रियांच्या उपेक्षित आयुष्याला उभारी आणण्याची असमर्थता प्रकट करते. त्यांच्या कवितेतून प्रामुख्याने तीन गोष्टीचा अविष्कार झालेला आहे. मुक्तीचा ध्यास, गुदमरल्या मनाचा आक्रोश आणि शुभकरंची उपेक्षा याची खंत या त्या तीन गोष्टी आहेत.

वर्ण व्यवस्थेऐवजी वर्ग व्यवस्था प्रबळ होत असताना जाताना पाहून दलितांनी स्वतःचा साधलेला स्वार्थ आणि सर्व जीवनालाच त्यामुळे येणारा दिखाऊपणा या कवयित्रीला अस्वस्थ करणारा आहे.

तेच पाढे, तेच चेहरे,
जरा सेफिस्टिकेटेड,
कवच बदलुन बाहेर पडत आहेत,
माझ्या स्वागताची आरती गात,
मी आपल्याच समाधानात,
बीज पेरून ठेवल्याच्या,
इथे तर आधीच प्रतिकाराची तयारी सुरु
मी साशंक,
एका तरी बी पासून तयार होईल का
पिंपळ वृक्ष.............."[२७]

**रविचंद्र हडसनकर यांची कविता :-**

दुसऱ्या पिढीतील एक दर्जेदार कवी म्हणून रविचंद्र हडसनकर यांचा उल्लेख करता येईल. त्यांचे 'ठिणगी' काव्य (१९७७), 'देणगी' काव्य (१९८३), 'अरे माणसा माणसा' (१९८७), 'हळद उन्हे', (१९९०), ' सूर्यझेप आणि तळगर्भ' (२००४) व 'राजमुद्रा' (२००४) इत्यादी त्यांचे कवितासंग्रह प्रकाशित आहेत. दुसऱ्या

पिढीचे नेतृत्व करणारी रविचन्द्र हडसनकर यांची कविता ही दलित जाणिवेच्याही पुढे गेलेली आहे. तिचा केंद्र बिंदू 'माणूस' आहे. म्हणून खऱ्या अर्थाने महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तत्वज्ञानाचा त्याच्या विचाराचा प्रसार करते. कवी रविचन्द्र हडसनकर यांची कविता ही बदलत्या जाणिवा सांगते व आक्रमक विद्रोह पुकारते.

समाजात माजलेली दुफळी आपल्याच नेत्यांच्याकडून आपल्याच लोकांची होणारी फसवणूक, चळवळीची झालेली दुर्दशा, सत्तेच्या खुर्चीखाली चिरडली जाणारी निरपराध दिन, दुबळी माणसे, तसेच दलित जीवनाचे बदलत्या जाणिवांचे व विशेषत: अठरा विश्वे दारिद्रय अंगावर घेऊन दारोदारी भीक मागणाऱ्या सुया-दोरे विकून पोट भरणाऱ्या स्त्रियांचे जीवन. यावर ही कविता भाष्य करते.

''हाच तो माझा गळा आज, आरोळी ठोकतो क्रांतीची,
...ज्याला अडकविले होते, तुम्हीच गाडगे,
हेच माझे हात, आज प्रत्युत्तराला उत्सावलेत,
जे हुकुमाखाली तुमच्याच, राबले होते.''२८

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धर्मांतराने पददलित समाजाचा खऱ्या अर्थाने कायापालट झाला. त्या वर्गाला आजवर विटंबीत शरीर होते. त्या देहाचा प्रत्येक अवयव शतकांपासून स्वामित्व स्वीकारण्याच्याच संस्कृति चक्रात घडवला गेला होता. पण आज ठिणग्या, ओकणाऱ्या, क्रांतीच्या सर्वभक्षी ज्वाला फेकणाऱ्या अस्मितेचा त्याला लाभ झाला आहे. आज तो नव्यानेच जन्मला आहे हीच गोष्ट रविचंद्र हडसनकर यांनी ह्या कवितेत स्पष्ट केली आहे. त्यांच्या 'राजमुद्रा' व 'सुर्यझेप' आणि 'तळगर्भ' या कविता संग्रहाचा अभ्यास पुढील प्रकरणात करण्यात येईल.

आतापर्यंत काव्य म्हणजे काय ? काव्याचे स्वरुप थोडक्यात सारांश मांडला आहे. १९६० नंतर मराठी साहित्याच्या प्रांतामध्ये 'दलित साहित्य' हा आगळावेगळा प्रवाह आला आणि एकूण मराठी साहित्याचा चेहरा मोहराच बदलून गेला. महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची प्रेरणा घेऊन, दलित साहित्य आपली वाटचाल करताना दिसून येते.

दलित कवितेला प्रारंभीच्या काळात दलित शाहिरांची महत्त्वाची परंपरा लाभली आहे. सुरूवातीच्या काळात दलित शाहिरीनेच विद्रोहीचे बिजारोपण केले.

पुढे स्वातंत्र्योत्तर काळात याच दलित शाहिरांचा वारसा घेऊन दलित कविता विद्रोहीचा धगधगता अंगार घेऊन आली. कवितेमधून दुःख मांडणारे नामदेव ढसाळ, केशव मेश्राम, यशवंत मनोहर आदी कविंनी व्यवस्थेच्या विरोधात प्रखर लेखन केले. दुसऱ्या पिढीची कवितेला हीच पार्श्वभूमी आहे. केशव मेश्राम, दया पवार, अर्जुन डांगळे, लहु कानडे, भीमसेन देठे, भुजंग मेश्राम, रविचन्द्र हडसनकर इ. आपले दुःख कवितेतून व्यक्त केले. तसचे काही दलित कवयित्रीनेही आपल्या जाणीवा कवितेमधून व्यक्त केल्या आहेत. त्या कवयित्री म्हणजे हिरा बनसोडे, ज्योती लांजेवार, सुरेखा भगत, प्रज्ञा लोखंडे, कुमुद पावडे, मीना गजभिये इत्यादी कवयित्रीने आपल्या दुःखाला वाचा फोडलेली आहे.

**निष्कर्ष :-**

या वरील विवेचनावरून काही महत्वाचे निष्कर्ष हाती लागतात ते खालीलप्रमाणे -

१) मराठीतील काव्य वाङ्:मयाचा प्रारंभात असणारे कवितेचे स्वरुप याचा विचार तसेच काव्य ही संकल्पना काही भारतीय व पाश्चात्य अभ्यासकांच्या व्याखेवरून स्पष्ट झाली.

२) मराठी कवितेला असणारी संत परंपरा बदलत्या काळानुसार अशा स्वरुपात बदलत जाणारी कविता व तिचे स्वरुप उलगडत गेले.

३) बदलत्या राजकिय स्थित्यंतरातून पारंपारिक कविता लोपपावत गेली व इंग्रजी शिक्षणाच्या परिमाणातून कविता सुशिक्षीत माणसापुरतीच कशी बनली होती हे स्पष्ट झाले व त्याचबरोबर कवितेला मर्यादेच्या साखळ दंडातून मुक्त करण्याचे काम मराठी कवितेचा क्रांतीसूर्य समजल्या जाणाऱ्या केशवसुतांनी केले व आधुनिक कवितेचा जन्म झाला.

४) आधुनिक मराठी कवितेच्या वाटचालीवर पुढे रविकिरण मंडळाच्या स्वरुपाने पंचकवीनी मराठी कवितेला वैविध्यतेने नटविले व मराठी कविता, गझल, सुनित अशा स्वरुपात विस्तारीत गेली.

५) नव काव्याचे जन्मदाता म्हणून बा. सी. मर्ढेकरांचे नाव घेतले जाते.

६) या नवकवितेच्या वहिवाटेवर मर्ढेकरांच्या विचारातून प्रेरणा घेऊन शरदचंद्र मुक्तीबोध पु. शि. रेगे, सदानंद रेगे, दिलीप चित्रे, मंगेश पाडगांवकर यासारख्या कवींनी मराठी नवकाव्याला उचतेच्या शिखरावर नेले.

७) अशा टप्याटप्याने बदलत जाणारी मराठी कविता, १९६० नंतर अनेक नियतकालिकांच्या माध्यमातून विस्तारीत गेली. तिच्या विस्ताराच्या दिशा ग्रामीण कविता, दलित कविता अशा प्रवाहातून प्रगल्भ होत गेल्या.

८) १९६० नंतर झालेल्या बदलातून मराठी कविता, ग्रामीण मातीतून अवतरु

लागली. ग्रामीण अनुभवाना कवितेच्या माध्यमातून आनंद यादव, विठ्ठल वाघ, ना. धों. महानोर, इंद्रजीत भालेराव यासारख्या अनेक मान्यवर कवींनी मांडले आहे.

९) स्वत्वाचे भान आलेल्या दलित तरुणांने आपल्या वेदना, विद्रोह, नकार यांचा उद्रेक कवितेच्या माध्यमातून व्यक्त केल्या व मराठी कविता दलित कवितेच्या रुपाने समृद्धी झाली. दलित कवितेला मराठी प्रवाहात आणण्याचे महत्त्वाचे काम ज. वि. पवार, दया पवार, त्र्यंबक संपकाळे, भीमसेन देठे, वामन निंबाळकर, अर्जुन डांगळे, नामदेव ढसाळ, रविचन्द्र हडसनकर इ. कवी व काही कवयित्रींने अशाप्रकारे केले आहे, हे स्पष्ट होते.

१०) १९८० नंतर दलित कविता अनेक अंगानी विस्तारीत गेली. दलित कवितेचा विस्तार करणारे या काळातील महत्त्वाचे कवी भीमसेन देठे, भगवान भोईर, दामोदर मोरे, रविचन्द्र हसनकर, प्रकाश मोगले, शरणकुमार लिंबाळे या कवितेची दुसरी पिढी समजल्या जाणाऱ्या कवींनी केले. रविचन्द्र हडसनकर १९८० नंतरच्या दुसऱ्या पिढीतील महत्त्वाचे दलित कवी आहेत. त्याच्या काव्य लेखनाचा अभ्यास त्यांच्या 'राजमुद्रा' व 'सूर्यझेप आणि तळगर्भ ' या दोन कविता संग्रहाच्या आधारे करण्यात येईल.

# संदर्भ सूची :

१) मंचरकर र. बा. भागवत धर्म आणि मराठी कथा कविता', धर्मसंप्रदाय आणि मध्युगीन मराठी वाङ्‌मय, प्रतिमा प्रकाशन, पुणे. प्रथमावृत्ती २०००. पृ. ६०.

२) धोंड. म. वा, 'मराठी लावणी, मौज प्रकाशन गृह, मुंबई, दुसरी आवृत्ती १९३८, पैजन, म. ना. अदवंत (संपादीत साहित्य प्रसाद केंद्र, नागपूर, दुसरी आवृत्ती १९८२)' पृ. क्र. ८

३) बेडेकर दि. के. : केशवसूतांनी काव्यदृष्टी, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पहिली आवृत्ती, १९६६, पृ. क्र. १२१.

४) करंदीकर गो. वि., 'माधव ज्यूलियन : एक प्रयोगशील कवी परंपरा आणि नवता पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, दुसरी आवृत्ती १९९८ पृ. १८३...'

५) जाधव रा. ग. 'निळीपहाट', श्री विद्याप्रकाशन, पुणे, पृ. ४४१९७८.

६) कुंभोजकर ललिता, 'दलित कविता एक दर्शन' प्रस्तावना भालचंद्र फडके, प्रतिमा प्रकाशन, पुणे १९८४.

७) सुर्वे नारायण, 'ऐसा गा मी ब्रम्ह, पॉप्युलर, प्रकाशन, मुंबई, द्वि. आ. १९७३, (चार शब्द, कविता)

८) फडके भालचंद्र, 'दलित साहित्य वेदना विद्रोह, श्रीविद्या प्रकाशन, पूणे, प्र. आ. १९७७.

९) ढसाळ नामदेव, 'गोलपिठा', निळकंठ प्रकाशन पुणे, द्वि. आ. १९९५, प्रस्तावना विजय तेंडूलकर.

१०) ढसाळ नामदेव, 'उनि, 'हे महाग्यानी लोक' कविता, पृ. क्र. ३४

११) ढसाळ नामदेव, अनि, माणसाने (कविता) निळकंठ प्रकाशन, पुणे.

१२) मेश्राम केशव, 'उत्खनन', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९७७ एक दिवस मी परमेश्वराला' (कविता) पृ. ७४

१३) पवार दया, कोंडवाडा, ' मेहता प्रकाशन, पूणे, प्र. आ. १९८२, रक्तात पेरुन गेलेला कविता, पृ. क्र. २४

१४) यशवंत मनोहर, 'उत्थानगुंफा', कॉन्टीनेटल प्रकाशन, पुणे, प्र. आ. १९७७ 'उत्थान गुंफा' कविता, पृ. क्र. ४२

१५) निंबाळकर वामन, 'गावकुसाबाहेरील कविता', प्रबोधन प्रकाशन, नागपूर 'शब्द, कविता पृ. क्र. २

१६) पवार ज. वि., 'नाकेबंदी' जयभारत प्रकाशन, मंबुई, प्र. आ. १९७६. 'मी आणि कामगार' कविता, पृ. क्र. ५०

१७) डांगळे अर्जुन, 'छावणी हालती आहे'कर्मवीर प्रकाशन नागपूर, प्र. आ. १९७७, भूके कंगालांचा जुलूस कविता) पृ. क्र. ४३.

१८) भवरे महेंद्र, 'दलित कवितेतील नवे प्रवाह', शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, प्र. आ. २००१, पृ. क्र. ६१.

१९) मेश्राम भुजंग, 'उलगुलान ', साकेत प्रकाशन, औरंगाबाद. द्वि. आ. १९९५, पृ. क्र. ८५

२०) कानडे लहू, 'टाचटिभा', सुगावा प्रकाशन, पुणे, द्वि. आ. १९९७ पृ. क्र. १४

२१) मेश्राम केशव, 'विद्रोही कविता', 'कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयनगर, पुणे ३०. पृ. क्र. ५६

२२) बनसोडे हिराबाई, 'फिर्याद' समाजप्रबोधन संस्था प्रकाशन, पुणे. प्र. आ. १९८४, पृ. क्र. ३१.

२३) लांजेवार ज्योति, 'दिशा', निखिल प्रकाशन, नागपूर प्र. आ. १९८४, 'कुरुक्षेत्र' (कविता)

२४) भगत सुरेखा, 'साक्ष', 'सिंहगर्जना' दिवाळी अंक १९८० आजपासूनच (कविता)

२५) लांजेवार ज्योती, 'दलित कवयित्रींची कविता' सुगावा डॉ. बाबासाहेब आंबेडकर विशेषांक १९९३ पृ. क्र. ९०

२६) लोखंडे प्रज्ञा, 'आंबेडकरवादी मराठी साहित्य', डॉ. यशवंत मनोहर भीमरत्न प्रकाशन, नागपूर, प्र. आ. १९९१, पृ. क्र. १९३, मधून उद्‌धृत.

२७) गजभिये मीना, 'सुगावा' डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रेरणा, विशेषांक १९९३, पृ. ९० मधून उद्‌धृत.

२८) मेश्राम केशव, 'विद्रोही कविता, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयनगर, पुणे ३०, पृ. ५७.'